# मेट्रो-३ प्रकल्पातील भुयारीकरणाचा तेरावा टप्पा पूर्ण




मुंबई : कुलाबा-वांद्रा-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पातील विधान भवन मेट्रो स्थानकामध्ये शुक्रवारी सकाळी ९ वाजून ३० मिनिटांनी भुयारीकरणाचा १३ वा टप्पा पूर्ण झाला.

- मेट्रो-३ या संपूर्ण प्रकल्पासाठी एकूण ५२ किमी लांबीचे भुयारीकरण करण्यात येणार असून आत्तापर्यंत २६.१५ किमीचे काम पूर्ण झाले आहे. रॉबिन्स या कंपनीच्या बनावटीचे सूर्या २ हे टीबीएम मशीनची लांबी ९५ मीटर इतकी लांब असून त्याचे वजन ६०० मेट्रिक टन इतके आहे. सूर्या २ टीबीएम प्रतिदिन ७ रिंग्सच्या वेगाने कफ परेड मेट्रो स्थानकापासून ते विधान भवन हे १.२४ किमीचे अंतर २०५ दिवसात पूर्ण केले असल्याची माहिती एमएमआरसीमार्फत देण्यात आली.

- मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन अंतर्गत पॅकेज १ मध्ये ५.८९ किमीपैकी २.४८ किमी इतके भुयारीकरण पूर्ण झाले असून अप आणि डाऊन दिशेतील एकूण ५२ किमीपैकी २६.१५ किमी इतके भुयारीकरण पूर्ण झाले आहे. तसेच मान्सून काळामध्ये मेट्रो कामांमुळे मुंबईकरांची गैरसोय टाळण्यासाठी एमएमआरसी विशेष खबरदारी घेत आहे.

- मुंबई मेट्रोच्या सर्व अभियंत्यांना तसेच कंत्राटदारांना येत्या मान्सूनदरम्यान करावयाच्या उपाययोजनांबद्दल सविस्तर निर्देश देण्यात आले आहेत. कामाच्या आजूबाजूचे रस्ते सुस्थितीत ठेवणे यासारखी कामे युद्धपातळीवर चालू असून ३१ मेपर्यंत पूर्ण होतील, असेही एमएमआरसीमार्फत सांगण्यात आले आहे.